॥ सा विद्या या विमुक्तये ॥
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड - ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED
'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA
Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

दिनांक : १७/०२/२०२३

## मा. कुलगुरू महोदयांचे अपीलांवरील निर्णय

विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेच्या अभ्यासमंडळ गटामधून अध्यक्ष निवडून देण्यासाठी नामनिर्देशन पत्राच्या संदर्भात मा. कुलगुरू महोदयांकडे अपील सादर केले होते. सदर अपीलांवर मा. कुलगुरू महोदयांनी सोबतच्या तक्त्याप्रमाणे निर्णय दिलेले आहेत.

स्वा/—
मा. कुलगुरू कार्यालय
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,
नांदेड

॥ सा विद्या या विमुक्तये ॥

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

आज़ादी का अमृत महोत्सव

## विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेच्या अभ्यासमंडळ गटामधून अध्यक्ष निवडून देण्यासाठी मा. कुलगुरू महोदयांकडे प्राप्त नामनिर्देशन अर्जा संदर्भात अपीलावरील निर्णय

संदर्भ:
१. सूचना व निवडणूक सूचना SRTMUN/Election/BoS/2022-23/1308 to 1335 Date 09.02.2023
२. पत्र क्रं. सभा व निवडणूक/२०२२–२३/१३५४ दि. १५/०२/२०२३
३. महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार—ब (असाधारण क्रमांक १२५) दि. १७ मे, २०१७

दिनांक १७/०२/२०२३

| अक्रं | अपिलकर्त्याचे नाव | मा. कुलगुरू महोदयांकडे दाखल केलेल्या अपीलाचा तपशिल | अपीलावर मा. कुलगुरू महोदयांनी घेतलेले निर्णय |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| 1 | डॉ. सुरेंद्र ग. गट्टाणी | दिनांक : १६/०२/२०२३ रोजी डॉ. सुरेंद्र ग. गट्टाणी यांनी अपील सादर केले.<br>मी Board of Studies in Pharmacedutics and Pharmaceutial Chemistry या अभ्यासमंडळावरील Chairman या पदासाठीचा निवडणूक नामनिर्देशनाचा अर्ज सादर केला होता. सदर अर्ज He was chairman of earlier Board of Studies of this Subject या कारणास्तव अवैध ठरवण्यात आला आहे.<br>याबाबत खालीलप्रमाणे अपिल सादर करत आहे, माझी या पुर्वीची सदर अभ्यासमंडळावरील chairman पदासाठी नियुक्ती ही नियमित नसून तदर्थ Ad-hoc अभ्यामंडळावर होती. त्यामुळे महाराष्ट्र विद्यापीठ कायदा २०१६ मधील कलम ६५ च्या तरतुदी मला लागू होत नाही अशी माझी धारना आहे. तरी याबाबतचे अपील मान्य करून माझा BoS Chairman in Pharmacedutics and Pharmaceutial Chemistry या पदाचा नामनिर्देशन अर्ज वैध ठरवण्यात यावा. | महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ६५ मध्ये खालीलप्रमाणे तरतुद आहे.<br><br>"व्यवस्थापन परिषदेचा कोणताही सदस्य किंवा **अभ्यासमंडळाचा अध्यक्ष म्हणून, निवडून आलेली, नामनिर्देशित केलेली, नियुक्त केलेली किंवा यथास्थिति, स्वीकृत केलेली कोणतीही व्यक्ती, लागोपाठच्या दुसऱ्या मुदतीकरता पात्र असणार नाही"**<br>परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास, जी कोणतीही व्यक्ती, विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची पहिल्यांदा सदस्य होती—मग ती असा सदस्य किंवा अभ्यास मंडळाचा अध्यक्ष म्हणून निवडून आली असेल, नियुक्त केली असेल, नामनिर्देशित केली असेल किंवा यथास्थितीत, स्वीकृत केली असेल तर—ती या अधिनियमाच्या प्रारंभानंतर, पहिल्यांदा नियुक्त केली असेल, नामनिर्देशित केली असेल, निवडून आली असेल, स्वीकृत केली असेल तर तिने, लागोपाठच्या मुदतीकरिता लाभ घेतला असल्याचे मानण्यात येणार नाही.<br><br>उक्त तरतुदीनुसार **अपिल अमान्य** करण्यात येत आहे. |

Swami Ramanand Teerth Marathwada University Estd. 17 Sep. 94 Nanded

| अक्रं | अपिलकर्त्याचे नाव | मा. कुलगुरू महोदयांकडे दाखल केलेल्या अपीलाचा तपशिल | अपीलावर मा. कुलगुरू महोदयांनी घेतलेले निर्णय |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| 2 | डॉ. शशिकांत सी. ढवळे | दिनांक : १६/०२/२०२३ रोजी डॉ. शशिकांत सी. ढवळे यांनी अपील सादर केले.<br>मी Board of Studies in Pharmacology, Toxicology, Pharmacognosy and Quality Assurance या अभ्यासमंडळाच्या चेअरमन पदासाठीचा नामनिर्देशनाचा अर्ज सादर केला होता. सदर अर्ज खालील कारणास्तव (शेरा) अवैध ठरविण्यात आला आहे.<br>शेरा : He was chairman of earlier Board of Studies of this Subject<br>याबाबत मी खालीलप्रमाणे अपील सादर करत आहे.<br>महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा, २०१६ मधील कलम ६५ च्या तरतुदीनुसार सलग दुसऱ्या टर्म मध्ये BoS Chairman होता येत नाही. तथापी, या तरतुदी मला खालीलप्रमाणे लागू होत नाहीत.<br>१. माझी यापुर्वीची Ad-hoc Board of Studies in Pharmacology, Toxicology, Pharmacognosy and Quality Assurance या तदर्थ अभ्यासमंडळाकरीता नामनिर्देशनाद्वारे चेअरमन पदावरील नियुक्ती नियमीत अभ्यासमंडळावरील नसून तदर्थ अभ्यासमंडळावरील होती तसेच दि. १३/०८/२०१८ ते २७/०७/२०२० या केवळ दोन वर्षाच्या कालावधीसाठी होती.<br>२. तसेच कालावधी संपुष्टात आल्यानंतर आजपावेतो अडीच वर्षाचा खंड झालेला आहे. या कालावधीमध्ये BoS Chairman पदी इतर शिक्षकांची नियुक्ती करण्यात आली होती.<br>त्यामुळे माझी यापुर्वीची BoS Chairman पदाची नियुक्तीच्या कार्यकाळ विचारात घेता महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६, कलम ६५ च्या तरतुदी माझी सलग दुसरी टर्म नसल्यामुळे माझ्या निवडणूक अर्जास लागू होत नाही. तरी माझ्या याबाबत अपिल मान्य करून माझा याबाबत निवडणूक अर्ज वैध करण्या विषयी विनंती आहे. | महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ६५ मध्ये खालीलप्रमाणे तरतुद आहे.<br><br>''व्यवस्थापन परिषदेचा कोणताही सदस्य किंवा **अभ्यासमंडळाचा अध्यक्ष म्हणून, निवडून आलेली, नामनिर्देशित केलेली, नियुक्त केलेली किंवा यथास्थिति, स्वीकृत केलेली कोणतीही व्यक्ती, लागोपाठच्या दुसऱ्या मुदतीकरता पात्र असणार नाही''**<br>परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास, जी कोणतीही व्यक्ती, विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची पहिल्यांदा सदस्य होती—मग ती असा सदस्य किंवा अभ्यास मंडळाचा अध्यक्ष म्हणून निवडून आली असेल, नियुक्त केली असेल, नामनिर्देशित केली असेल किंवा यथास्थितीत, स्वीकृत केली असेल तर—ती या अधिनियमाच्या प्रारंभानंतर, पहिल्यांदा नियुक्त केली असेल, नामनिर्देशित केली असेल, निवडून आली असेल, स्वीकृत केली असेल तर तिने, लागोपाठच्या मुदतीकरिता लाभ घेतला असल्याचे मानण्यात येणार नाही.<br><br>उक्त तरतुदीनुसार **अपिल अमान्य** करण्यात येत आहे. |

Swami Ramanand Teerth Marathwada University Estd. 17Sep.94 Nanded